दैनिक

अन्यायाचा प्रतिकार

# रायगड नगरी

महाराष्ट्राचा बुलंद आवाज..

● वर्ष १६ वे ● अंक २४५ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● मंगळवार दि.३० नोव्हेंबर २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com


## राज्यात आज कोरोनाचे नवे रुग्ण घटले, एकूण सक्रिय रुग्णही झाले कमी

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्यात आज कोरोनाच्या दैनंदिन रुग्णसख्येत घट झाली असून एकूण सक्रिय रुग्णसंख्येतही घट झाल्याने दिलासा मिळाला आहे. असे असले तरी आज मृत्युसंख्येत काहीशी वाढ झाली आहे. आज राज्यात एकूण २१ रुग्णांचा मृत्यू झाला आहे. तर दिवसभरात ८५३ करोना बाधित रुग्ण बरे होऊन घरी गेले आहेत. तसेच आज ५३६ नव्या करोना रुग्णांचे निदान झाले आहे. तर, राज्यात आज ७ हजार ८५४ रुग्णांवर (सक्रिय रुग्ण) उपचार सुरू आहेत. ही माहिती राज्याच्या आरोग्य विभागाने दिली आहे.

राज्यात आजपर्यंत एकूण ६४ लाख ८२ हजार ४९३ करोना बाधित रुग्ण बरे होऊन घरी गेले आहेत. यामुळे राज्यातील रुग्ण बरे होण्याचे प्रमाण ९७.७ टक्के झाले आहे. आजपर्यंत तपासण्यात आलेल्या ६ कोटी ५४ लाख २० हजार ११७ प्रयोगशाळा नमुन्यांपैकी ६६ लाख ३४ हजार ९८० नमुने पॉझिटिव्ह आले आहेत. हे प्रमाण १०.१४ टक्के इतके आहे. सध्या राज्यात ८५ हजार ८०० व्यक्ती होम क्वारंटाइनमध्ये आहेत, तर १ हजार ०२८ व्यक्ती संस्थात्मक क्वारंटाइनमध्ये आहेत.

# महापालिका क्षेत्रातील कोविड रूग्णालयांना सर्तकतेच्या सूचना

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कोविडच्या ओमिक्रॉन या नव्या धोकादायक विषाणूचा संसर्ग रोखण्यासाठी आयुक्त गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिका क्षेत्रातील ३७ रूग्णालयांची ऑनलाईन पध्दतीने बैठक घेण्यात आली. यावेळी कोविड रूग्णालयांना सतर्क राखण्याच्या सूचना देण्यात आल्या

तिसऱ्या लाटेच्या पार्श्वभूमीवर सर्व यंत्रणा अद्ययावत करण्याच्या सूचना यावेळी कोविड रूग्णालयांना देण्यात आल्या. तसेच शासन नियमांनूसार महापालिका हद्दीतील कोविड रूग्णांलयांनी त्यांचे फायर, स्ट्रक्चरल ऑडीट आणि ऑक्सीजन पुरवठाविषयीची माहिती पालिकेला सादर न करणाऱ्या रूग्णालयांना कारणे दाखवा नोटीस बजावली जाणार आहे.

तसेच या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या रूग्णालयांवर पालिकेच्यावतीने दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे. संशयित पॉझीटिव्ह रूग्णांची माहिती पालिकेला कळविण्याच्या सूचनाही रूग्णालयांना देण्यात आल्या.

तसेच पालिका क्षेत्रातील प्रयोगशाळांस ओमिक्रॉन/बी १.१.५२९ या नमुन्याबाबतची माहिती पालिकेच्या वैद्यकिय आरोग्य विभागास देण्याविषयीच्या सूचना यावेळी देण्यात आल्या. सर्व खाजगी रूग्णांलयाना ओमिक्रॉन विषाणू विषयीची माहिती सांगून या पार्श्वभूमीवर तिसऱ्या लाटेसंदर्भात सर्व तयारी करून सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या. या बैठकिस उपायुक्त सचिन पवार, मुख्य वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी, वैद्यकिय अधिकारी डॉ. भक्तराज भोईटे, डॉ. सुरेश पंडित, रूहिता शेलार तसेच पालिका क्षेत्रातील कोविड रूग्णालयांचे प्रतिनिधी उपस्थित होते.



# टँकरच्या धडकेत तिघांचा दुर्दैवी मृत्यू

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल जवळील तळोजा औद्योगिक वसाहतीमध्ये दिपक फर्टिलायझर्स कंपनी जवळच्या रस्त्यावर आज झालेल्या भीषण अपघातात पनवेल महापालिकेच्या दोन कंत्राटी सफाई कामगारांसह सिडकोच्या माळी कामगाराचा मृत्यू झाला आहे.

पनवेल महानगरपालिकेत काम करणारे दोन कंत्राटी सफाई कामगार तसेच सिडकोचा एक माळी कामगार हे तळोजा एमआयडीसीतील काम करून मोटारसायकलवरून घरी परत जात होते. दिपक फर्टिलायझर कंपनी जवळच्या रस्त्यावर एका टँकरखाली चिरडून दोन सफाई कामगारांचा जागीच मृत्यू झाला तर माळी कामगाराचा एमजीएम हॉस्पिटलमध्ये मृत्यू झाल्याची माहिती मिळाली आहे. शांताराम निरगुडा आणि काळुराम पारधी या दोन सफाई कामगारांचा जागीच मृत्यू झाला आहे. अपघात झाल्याचे समजताच ताबडतोब मोठी गर्दी जमा झाली.

पोलिसांनी ताबडतोब घटनास्थळी येऊन जमावाला शांत केले. दरम्यान साई गणेश इंटरप्रायझेस या कंपनीचे व्यवस्थापक राकेश भुजबळ यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी या





वृत्ताला दुजोरा देत असताना सांगितले की शांताराम निरगुडा वय (२७ वर्ष ) आणि काळुराम पारधी (वय २७ वर्ष) हे दोन्ही कामगार हे आमच्याकडे कामाला असून कामावरून घरी जात असताना त्यांना अपघात झाल्याची माहिती मिळाली आहे. दोघांना उपजिल्हा रुग्णालयात आणले असता त्यांना मृत घोषित करण्यात आले आहे. तसेच त्यांच्यासोबत त्यांचा मित्र भुऱ्या पारधी हा माळी कामगार होता.

अपघातात गंभीर जखमी झाल्याने त्याला एमजीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे, परंतु त्याचाही मृत्यू झाला आहे. या अपघाताची नोंद तळोजा पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

## जसखार ग्रामस्थांचा महेंद्र घरत यांच्या उपस्थितीत काँग्रेस पक्षात प्रवेश

**दै.रायगड नगरी । उरण**

रायगड जिल्हा काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांनी रायगड जिल्हा काँग्रेसची सुत्रे हाती घेतल्यापासून रायगड जिल्ह्यातील काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य संचारले आहे. स्वतः महेंद्र घरत हे पायाला भिंगरी लावुन ज्या ठिकाणी दहा-दहा वर्ष काँग्रेसच्या बैठका झाल्या नाहीत त्या-त्या ठिकाणी अगदी रायगड जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यात जाऊन बैठका घेत आहेत. त्यामुळे काँग्रेस पक्षापासून दुर गेलेले सर्व काँग्रेसवासी घरवापसीच्या तयारीत आहेत.



रायगड काँग्रेसला महेंद्र घरत यांच्यासारखे खंबीर नेतृत्व मिळाल्यामुळे जिल्ह्यात काँग्रेसला गतवैभव प्राप्त होईल असे सगळीकडे बोलले जात आहे. त्यांच्या कार्यशैलीवर व नेतृत्वावर प्रभावित होवुन जसखारमधील ग्रामस्थांनी शेलघर येथील सुखकर्ता निवासस्थानी महेंद्र घरत यांच्या उपस्थितीत काँग्रेस पक्षात प्रवेश केला.

यावेळी हेमंत ठाकूर, प्रविण ठाकूर, राजेश ठाकूर, निलेश तांडेल, संजीवनी मढवी, आतिश ठाकूर, केतन तांडेल, सुनील ठाकूर, रमेश ठाकूर, विकास ठाकूर, सुरेश पाटील, राजेश म्हात्रे, राजन ठाकूर, धिरज म्हात्रे, प्रथमेश ठाकूर, धिरज ठाकूर, दिपांशु ठाकूर, आकाश ठाकूर, नरेश ठाकूर, हेमंत ठाकूर, शैलजा ठाकूर, नम्रता ठाकूर, नलिनी ठाकूर, पूजा मढवी, कामिनी म्हात्रे, अंकिता ठाकूर, कृतिका ठाकूर, निकिता भोईर, हेमंत पांडुरंग ठाकूर, वैष्णव ठाकूर, कुशल ठाकूर, निखील ठाकूर, यज्ञेश ठाकूर आदींनी पक्षप्रवेश केला. याप्रसंगी रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांनी हेमंत यशवंत ठाकूर यांची काँग्रेस जसखार गाव अध्यक्षपदी नियुक्ती केली आहे.

## संक्षिप्त...

### मीरा-भाईंदरचे दोघे लाचखोर पोलीस उपनिरीक्षक एसीबीच्या जाळ्यात

**दै.रायगड नगरी । ठाणे**

एका फसवणुकीच्या प्रकरणात अटक न करण्यासाठी दहा लाखांची मागणी करून नंतर ती अडीच लाखांवर तडजोड करून ५० हजारांची लाच स्वीकारणाऱ्या मीरा रोड पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक गोविंद एकीलवाले आणि प्रकाश कांबळे यांना ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) सोमवारी रात्री ताब्यात घेतले. त्यांच्याविरुद्ध लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियमाखाली मीरा रोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केल्याची माहिती एसीबीने दिली.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार यातील एका तक्रारदाराविरुद्ध शहाबुद्दीन पठाण यांनी फसवणुकीबाबत केलेल्या तक्रार अर्जाची चौकशी मीरा रोड पोलीस ठाण्याचे उपनिरीक्षक गोविंद एकीलवाले (३२, रा. मीरा रोड, ठाणे) हे करीत होते. त्याच अर्जाच्या अनुषंगाने तक्रारदार यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करून त्यात त्यांना अटक करू नये, यासाठी एकीलवाले यांनी तक्रारदाराकडे तब्बल दहा लाखांच्या लाचेची मागणी केली. त्यासाठी उपनिरीक्षक प्रकाश कांबळे यांनीही त्यांना प्रोत्साहित केल्याची तक्रार २ नोव्हेंबर २०२१ रोजी ठाणे एसीबीकडे तक्रार दाखल झाली होती. याच तक्रारीच्या अनुषंगाने ३ नोव्हेंबर रोजी एसीबीने याची पडताळणी केली. तेव्हा एकीलवाले यांनी तक्रारदाराकडे रक्कम न सांगता लाचेची मागणी केली. त्यानंतर २६ नोव्हेंबर रोजी पुन्हा एसीबीने पडताळणी केली. त्यावेळी तक्रारदाराकडे पुन्हा अडीच लाखांची मागणी केली. त्यावेळी उपनिरीक्षक कांबळे यांनीही ही लाचेची रक्कम देण्यासाठी प्रोत्साहित करून ती २९ नोव्हेंबर रोजी स्वीकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले.

## पाली झाप बलाप बायपास मार्ग भूसंपादन प्रक्रियेत शेतकरी आक्रमक

### मोजणीसाठी आलेल्या ठेकेदार व अधिकाऱ्यांना पळविले

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

महाराष्ट्रातील अष्टविनायक तीर्थ क्षेत्रापैकी प्रख्यात धार्मिक स्थळ व सुधागड तालुक्याचे मुख्यालय असलेल्या पालीतील सातत्याने वाहतूक कोंडीचा तिढा सोडवण्यासाठी बायपास मार्गाचा पर्याय उभा केला जात आहे. मात्र नव्याने होऊ घातलेल्या पाली झाप बलाप बायपास मार्ग हा आमच्या बापजाद्यांच्या दुबार पिकी शेतजमिनी उध्वस्त करणार असल्याचा संताप येथील स्थानिक शेतकऱ्यांनी व्यक्त केलाय. शेतकऱ्यांच्या तक्रारींचे जोपर्यंत निवारण होत नाही तोपर्यंत शेतात कुणालाही पाय ठेऊ देणार नाही, असा इशारा देत स्थानिक शेतकऱ्यांनी मोजणीसाठी आलेल्या अधिकाऱ्यांना शेतकऱ्यांनी ठणकावल, व मोजणीसाठी आलेल्या ठेकेदार व भूमिअभिलेख कार्यालयाच्या कर्मचारी व अधिकाऱ्यांना बुरमाळी येथील शेतकऱ्यांच्या रोषाला सामोरे जावे लागले.

विकासाच्या नावाखाली शेतकरी देशोधडीला लागणार असेल तर प्राण गेले तरी चालेल आम्ही मागे हटणार नाही, असा संताप शेतकऱ्यांनी व्यक्त केला. आम्हाला विश्वासात घेतल्याखेरीज भूसंपादनाची कोणतीही प्रक्रिया करू नये अशी मागणी शेतकऱ्यांनी केली. बायपास होईल इथून मोठमोठ्या महागड्या आलिशान गाड्याही धावतील, पण आमच्या संसारावर नांगर फिरला जाईल, आमच्या पिढ्यानपीढ्या कसत असलेली शेती उध्वस्त होईल, मग आम्ही खाणार काय? आमचे कुटुंब जगणार कसे? आम्हाला पर्यायी रोजगाराची संधी काय मिळणार? असे अनेक सवाल शेतकऱ्यांनी यावेळी उपस्थित केलेत. बायपास साठी इतर पर्यायी जागा शोधा, किंवा मुंबई, पनवेल व ठाणे आदी बड्या शहरात वाहतूक कोंडी फोडण्यासाठी जसे उड्डाण पूल निर्माण केलेत, तसे उड्डाण पूल बांधा



अशी मागणी शेतकऱ्यांनी केलीय. जोपर्यंत आम्हा शेतकऱ्यांना समाधानकारक मोबदला मिळत नाही तोपर्यंत आमच्या शेतात पाय ठेऊ देणार नाही असा इशारा संतप्त शेतकऱ्यांनी दिलाय. येथील पाली, झाप, बुरमाळी येथील शेतकऱ्यांनी आक्रमक भूमिका घेत सदर बायपास मार्गाला कडाडून विरोध दर्शविला . याबरोबरच या प्रक्रियेत धनदांडगे, राजकीय पुढारी, बडे उद्योजक यांना सोयीस्कररित्या अभय दिला जात आहे तर पिढ्यानपिढ्या कसल्या जाणाऱ्या गोरगरीब कष्टकऱ्यांचे

.../२

## सुकेळी खिंडीत कंटेनर अपघातात चालक गंभीर जखमी

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

मुंबई- गोवा महामार्गावरील सुकेळी खिंडीत कोलाड बाजुच्या उतारावरती कंटेनरची संरक्षक भिंत असलेल्या कठाड्याला जोरदार धडक दिल्यामुळे भीषण अपघात झाला. या अपघातामध्ये कंटेनर चालक गंभीर जखमी झाला आहे. हा अपघात सोमवार (दि.२९ ) रोजी सकाळी ९.४५ वाजता घडला.

महामार्ग पोलिस यांच्याकडून उपलब्ध झालेल्या माहितीनुसार महामार्गावर नागोठणे बाजुकडुन कोलाडच्या दिशेकडे जाणारा कंटेनर हा सुकेळी खिंडीच्या उतरावर आला असता कंटेनर चालकाचे गाडीवरुन नियंत्रण सुटल्यामुळे कंटेनर सरळ जाऊन रस्त्याच्या बाजूला असलेल्या संरक्षक भिंतीला धडकला. या अपघातात कंटेनर चालक सुनिल संतोषसिंग ठाकुर ( वय-३५) याच्या पायाला गंभीर स्वरुपाची जखम झाली असुन त्याला तात्काळ कोलाड प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी नेण्यात आले. दरम्यान या अपघाताची खबर मिळताच महामार्ग ऐनघर पोलिस चौकीचे पोलिस उपनिरीक्षक परशुराम भोईर यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व कर्मचाऱ्यांनी क्रेनच्या सहाय्याने कंटेनर रस्त्यावरुन बाजुला करुन वाहतुक सुरळीत चालू करण्यात आली. या अपघाताचा पुढील तपास कोलाड पोलिस करीत आहेत.

## जिल्हा परिषद सदस्यांची संख्या वाढविण्याचा सरकारचा निर्णय

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्यातील जिल्हा परिषदांची सदस्य संख्या वाढविण्याबाबत आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे होते. या संदर्भातील विधेयक आगामी विधिमंडळ अधिवेशनात मांडण्यात येणार आहे.

सध्या राज्यातील जिल्हा परिषद सदस्यांची संख्या कमीत कमी ५० व जास्तीत जास्त ७५ इतकी आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ मधील कलम ९ (१) मध्ये सुधारणा करून जिल्हा परिषद सदस्यांची संख्या कमीत कमी ५५ व जास्तीत जास्त ८५ असे करण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे. या सुधारणेमुळे सध्याची जिल्हा परिषद सदस्यांची संख्या २००० वरुन २२४८ इतकी होईल. त्याचप्रमाणे पंचायत समिती सदस्यांची संख्या देखील ४००० वरुन ४४९६ इतकी होईल.

राज्य निवडणूक आयोग, जिल्ह्यातील निर्वाचक गटांतून थेट निवडणूकीद्वारे निवडून द्यावयाच्या सदस्यांची संख्या निश्चित करील. तथापि, एखाद्या जिल्हा परिषदेच्या प्रादेशिक क्षेत्राची लोकसंख्या आणि निवडणूकीव्दारे भरवण्यात येणाऱ्या अशा जिल्हा परिषदेमधील जागांची संख्या यामधील प्रमाण, शक्य असेल तेथवर, राज्यभर सारखेच असेल.

पंचावन्न निर्वाचक गटांची किमान संख्या, राज्यातील जिल्ह्यांमधील कमी लोकसंख्या असलेल्या जिल्हयांसाठी नियतवाटप करण्यात येईल. प्रत्येक जिल्ह्याची लोकसंख्या विचारात घेऊन, त्या जिल्ह्यासाठी पुढील सुत्राचा अंगीकार करुन काढलेल्या प्रत्येक लोकसंख्येसाठी अतिरिक्त निर्वाचक गट असेल :- क्ष म्हणजे राज्यातील जिल्ह्यामधील सर्वात अधिक लोकसंख्या. वाय म्हणजे राज्यातील जिल्ह्यामधील सर्वात कमी लोकसंख्या उपरोक्त प्रमाणे लोकसंख्यासूत्राच्या आधारे प्रत्येक जिल्ह्यामध्ये अतिरिक्त निर्वाचक गटांची संख्या निर्धारित करतेवेळी जर लोकसंख्येचा अपूर्णांक अर्धा किंवा त्यापेक्षा अधिक असेल तर प्रत्येक अतिरिक्त निर्वाचक गटासाठी तो एक निर्वाचक गट असा हिशेब धरण्यात येईल आणि जर

.../२

## व्यापाऱ्यावर हल्ला करून १९ लाखांची रोकड लुटणाऱ्या त्रिकुटाचा शोध सुरू

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एका सोने खरेदी करण्यासाठी आलेल्या व्यापाऱ्यावर ३ जणांनी हल्ला करून त्याच्याजवळ असलेली १९ लाखांची रोकड लंपास केल्याची घटना पनवेल जवळील कामोठे बस थांब्याजवळ घडली असून त्या त्रिकुटाचा शोध पोलिसांची विविध पथके करीत आहेत.

व्यापारी संतोष जाधव (वय-३८) यांची अंबेजोगाई येथे सोन्याची पेढी आहे. ते नेहमी मुंबई परिसरात येऊन सोन्या चांदीची खरेदी करून माल घेऊन जात असतात. अशाचप्रकारे ते मुंबई येथे सोने खरेदी करण्यासाठी एका खाजगी बसमधून कामोठे येथे खाली उतरले व ते त्यांची मैत्रीण बसलेल्या स्विफ्ट गाडीकडे जात असताना तीन अनोळखी इसमांनी संतोष जाधव यांच्या चेहऱ्यावर हाताने मिरची पूड लावून त्यांच्या पाठीवर असलेली १९ लाख रुपये रोख रक्कमेची बॅग व जिम बॅग ओढायला लागले. त्यांना जाधव यांनी विरोध करताच त्या त्रिकुटाने त्यांच्या कडे असलेल्या धारदार शस्त्राने त्यांच्या मानेवर, हातावर, बरगड्यांवर वार करून त्यांच्या जवळ असलेली १९ लाखांची रोकड घेऊन ते पसार झाले. जाधव यांना नजिकच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

या घटनेची माहिती मिळताच अति. पोलिस आयुक्त महेश घुर्ये, पोलिस उपायुक्त सुरेश मेंगडे, पोलिस उपायुक्त शिवराज पाटील, सहायक पोलिस आयुक्त भागवत सोनावणे, वरिष्ठ पोलिस निरीक्षक, कामोठे स्मिता जाधव यांच्या सह गुन्हे शाखेची विविध पथके घटनास्थळी रवाना झाली होती. प्रत्यक्षदर्शी पाहणाऱ्या व्यक्ती व त्यांनी दिलेली माहिती, परिसरातील सिसिटिव्हि फुटेज व इतर तांत्रिक तपासाद्वारे या त्रिकुटाचा शोध पोलिसांची पथके घेत आहेत.

# ‘ओमिक्रॉन’चे आव्हान

दक्षिण आफ्रिकेत करोना विषाणूचा ओमिक्रॉन हा नवा उत्परिवर्तित प्रकार आढळल्याने आणि यापूर्वीच्या डेल्टा प्रकारापेक्षाही तो घातक ठरू शकतो असे अनुमान असल्याने चिंता वाढणे स्वाभाविक आहे. करोनाची साथ सुरू होऊन दोन वर्षे होत आली असली, तरी ती संपण्याची चिन्हे नसल्याचे युरोपमधील नव्या लाटेमुळे जाणवत होतेच; ओमिक्रॉनमुळे संसर्ग वेगाने वाढविण्याची भीती आहे. दक्षिण आफ्रिकेतील संशोधन संस्था आणि जागतिक आरोग्य संघटना यांनी नव्या विषाणूबद्दल माहिती दिली असली, तरी त्याचे संपूर्ण स्वरूप अद्याप उलगडलेले नाही; त्यामुळे आतापर्यंतची उपचार पद्धत आणि लस यांचा नेमका परिणाम कसा होईल हे समजण्यास वेळ लागेल. म्हणूनच अधिक दक्षता घेणे गरजेचे असून, बहुतेक देशांची पावले त्या दिशेनेच पडत आहेत. ओमिक्रॉनचा संसर्ग असलेल्या देशांची विमानसेवा बंद करण्यापासून तेथून येणाऱ्या प्रवाशांची चाचणी घेण्यापर्यंत आणि नव्याने निर्बंध लादण्यापासून लॉकडाउनपर्यंतच्या विविध शक्यतांची चाचपणी केली जात आहे. देशातही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रतिबंधक उपायांबाबत अधिकाऱ्यांना सूचना दिल्या आहेत, तर राज्याने निर्बंधांची नियमावली जाहीर केली आहे. नवा विषाणू आढळल्यानंतर शेअर बाजाराच्या निर्देशांकात मोठी घसरण झाली. संसर्ग वाढण्याची भीती यातून दिसते. वास्तविक घाबरून नव्हे, तर सावध आणि आरोग्यसज्ञ राहून संसर्गाचा मुकाबला करायला हवा; परंतु सर्व पातळ्यांवर प्रतिबंधात्मक आणि उपचारात्मक उपायांऐवजी भीती निर्माण करण्याचाच प्रकार घडतो आहे. तो थांबायला हवा. करोनाच्या भीषण अशा दुसऱ्या लाटेतून सावरत असतानाच नव्या विषाणूचे संकट आले आहे. तिसरी लाट येण्याची शक्यता सातत्याने वर्तविली जात असली, तरी देशात आणि राज्यात काही अपवाद वगळता संसर्गाचा वेग खूप कमी झाला आहे. गणेशोत्सवापासून दिवाळीपर्यंतच्या सणासुदीत रस्त्यांवरील आणि बाजारपेठांतील गर्दी वाढूनही करोनारुग्णांची संख्या घटत गेल्याने वातावरण निर्धास्त होत गेले. विविध क्षेत्रांवरील निर्बंधही शिथिल होत गेले आणि बाजारपेठा पूर्वपदावर येत गेल्या. महाराष्ट्रात हॉटेल वगैरे पूर्ण क्षमतेने, तर नाट्यगृहे, चित्रपटगृहे निम्म्या क्षमतेने सुरू झाली. शाळा आणि महाविद्यालये सुरू करण्याबाबत राज्य सरकार खूपच सावधानतेने पावले उचलत आहे. मोठ्या प्रमाणावर मागणी होऊ लागल्याने पहिलीपासून सर्व वर्गांच्या शाळा आता सुरू होत आहेत. पुण्यात नाट्यगृहांत आणि चित्रपटगृहांत पूर्ण क्षमतेने प्रवेश देण्याची; तसेच खुल्या कार्यक्रमांना परवानगी देण्याची मागणी मान्य करून उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी तसा निर्णयही जाहीर केला. सारे काही पूर्वीप्रमाणे होत असताना नवा विषाणू आढळल्याने सरकार आणि प्रशासन पेचात सापडले आहे. ओमिक्रॉनला थोपवून धरण्यासाठी उपाययोजना करणे भाग पडत आहे. महाराष्ट्राने शनिवारी नियमावली जाहीर करून प्रतिबंधात्मक उपायांसाठीचे पाऊल उचलले आहे. त्यानुसार सार्वजनिक वाहतूक सेवेपासून मॉल, दुकाने आदींपर्यंत सर्वत्र लशींचे दोन्ही डोस घेतलेल्यांनाच प्रवेश दिला जाणार आहे. कोव्हिडच्या नियमांचे पालन न करणाऱ्यांना किमान पाचशे रुपयांपासून दंड आकारला जाणार आहे. राज्य सरकारच्या या उपाययोजना आवश्यकच आहेत; परंतु पुण्यात उपमुख्यमंत्र्यांनी जाहीर केलेला निर्णय आणि राज्य सरकारची नियमावली यांमध्ये विसंगती असल्याने संभ्रम निर्माण झाला असून, तो दूर करण्याची गरज आहे. कोव्हिडच्या नियमांचे पालन करण्याची आवश्यकता परत परत सांगण्याची गरज नाही. करोनाच्या घातकपणाचा अनुभव घेऊनही लोकांनी दक्षता न घेणे म्हणजे बेफिकिरीचा कळसच म्हणावा लागेल. सुरक्षित अंतर राखून वावरण्यापासून मास्क वापरण्यापर्यंत आणि वारंवार हात धुण्यापासून सॅनिटायझर वापरण्यापर्यंतची काळजी प्रत्येकाने घ्यायलाच हवी. मुख्य म्हणजे लशींचे दोन्ही डोस घ्यायला हवेत. दुसऱ्या लाटेची तीव्रता अनुभवल्यानंतर लस घेण्यासाठी केंद्रांवर मोठी गर्दी होत होती; त्यावेळी लशींचा तुटवडाही होता. आता लशीसाठी पुरेसा आहे; परंतु लस घेण्यास लोक उत्सुक नसल्याचे चित्र आहे. दुसरा डोस घेण्यासाठी पात्र असूनही आणि मोफत लस सहज उपलब्ध असूनही लोक त्याकडे पाठ फिरवत आहेत. देशात लशींचे १२१ कोटी डोस देण्यात आले असून, ७० कोटींहून अधिक डोस देण्याची गरज आहे. सध्या दररोज ७० ते ७५ लाख लोकांचे लसीकरण होत आहे; परंतु हा वेग वाढविण्याची आवश्यकता आहे. अमेरिका आणि काही युरोपीय देशांत लशींचे दोन्ही डोस झाल्यानंतर बूस्टर डोसही दिला जात आहे. भारतात अजून पूर्ण लसीकरण झालेले नाही. ते झाल्यानंतर करोना प्रतिबंधक क्षमता वाढणार आहे. त्यामुळे लसीकरणाला गती देण्यासाठी व्यापक मोहीम आखायला हवी. संपूर्ण लसीकरण, प्रतिबंधात्मक उपाय आणि सर्व सुविधांनी सुसज्ज रुग्णालये यांद्वारेच नवनव्या रूपांतील करोना विषाणूंचा मुकाबला आणखी काही काळ करावा लागणार याची खूणगाठ सर्वांनीच बांधायला हवी.

# कळंबोलीतील लिमये महाविद्यालयाने वाचन संस्कृती रुजविण्यासाठी सुरू केले फिरते वाचनालय

**दै.रायगड नगरी । कळंबोली**

२१ व्या शतकातील सोशल मीडियाच्या दुनियेत विद्यार्थी, नागरिक व समाज जीवनामध्ये वाचन संस्कृतीची ओळख रुजावी, नागरिकांनी वाचनाचा छंद जोपासावा याकरता सुधागड एज्युकेशन सोसायटीचे कळंबोली येथील शिक्षण महर्षी दादासाहेब लिमये महाविद्यालयाने शिक्षणमहर्षी दादासाहेबांच्या ११२ व्या जयंतीचे औचित्य साधून फिरते ग्रंथ वाचनालय सुरू केले आहे. या वाचनालयाचा सदुपयोग महाविद्यालयाने दत्तक घेतलेल्या गावातील विद्यार्थी नागरिकांसाठी होणार आहे याकरता महाविद्यालयातील विद्यार्थी प्राध्यापक व नागरिकांनीही फिरत्या वाचनालयाला ग्रंथ दानही केले आहे.

शिक्षण महर्षी दादासाहेब लिमये महाविद्यालयात शिक्षण महर्षी दादासाहेब लिमये यांची ११२ वी जयंती मोठ्या उत्साहात विविध कार्यक्रम आयोजन करून साजरी करण्यात आली.या कार्यक्रमात प्रा डॉ. बी बी जाधव (जिल्हा समन्वयक व कार्यक्रम अधिकारी एन एस एस) यांनी शिक्षण महर्षी दाद-ासाहेब लिमये यांच्या शैक्षणिक कार्याचा आढावा घेऊन दादांचे विचार तळागाळातील विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याचे व देशभक्ती स्वावलंबन, समता रुजविण्याचे होते हे स्पष्ट केले. दादांनी एन एस एस ला विशेष महत्व दिलेले होते. एन एस एस फक्त मर्यादित विद्यार्थ्यांसाठी न ठेवता महाविद्यालयातील सर्वांना छड्ड कामामध्ये सहभागी करून घ्यावे असे त्यांचे विचार होते. त्यामुळेच त्यांच्या जयंती निमित्ताने फिरते ग्रंथालय चालू करून या ग्रंथालयाचा उपयोग दत्तक गावातील मुलांना समाजातील नागरिकांना वाचन संस्कृती वाढवण्यासाठी होईल या दृष्टीने चालू करण्यात आले.

याप्रसंगी ग्रंथालयाचा उद्देश व स्वरूप स्पष्ट करण्यात आले. यासाठी एनएसएस स्वयंसेवक व प्राध्यापकांनी ग्रंथ दान मोठ्या प्रमाणात के ले व पुढे सुद्धा करणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ एस सी लहूपचांग होते.

त्यांनी महाविद्यालयाचा विकास स्पष्ट करून एनएसएसच्या स्वयंसेवकांनी सामाजिक बांधिलकीने या फिरत्या ग्रंथालयाचा उपयोग समाजातील घटकापर्यंत व विद्यार्थ्यांनी स्वतः साठी सुद्धा करावा हे स्पष्ट केले. या कार्यक्रमामध्ये मंजूश्री सुळे, पंचरत्न पनाड, अरबाज पिंजारी निखिल दौंडकर यांनी नेतृत्वगुण विकास शिबिर मुंबई विद्यापीठाचे पूर्ण केले असल्यामुळे त्यांचा सत्कार करण्यात आला तसेच एस.वाय.बी.ए च्या पंचरत्मा पनाड व मनिषा पुकळे यांना जिल्हा स्तरीय प्रश्नमंजुषा स्पर्धेत दुसरा क्रमांक मिळाल्याबद्दल प्रमाणपत्र देऊन सत्कार केला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन मंजुश्री सुळे, प्रेरणा गीत शारदा भोसले, मेघा चोरगे तसेच पाहुण्यांची ओळख तेजस महाजन व आभार पंचरत्मा पनाड यांनी मानले. कार्यक्रमामध्ये प्राध्यापक, कर्मचारी, स्वंयसेवक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.



# उरण शहर आयोजित आरोग्य शिबिराला उत्तम प्रतिसाद

**दै.रायगड नगरी । उरण**

नागरिकांचे आरोग्य निरोगी राहावे, त्यांचे जीवन सुखी, आनंदी व्हावे व आरोग्यविषयक जनजागृती व्हावी या दृष्टिकोनातून काल सकाळी ११ ते दुपारी ४ या वेळेत तेरापंथी हॉल,अमन पॉलीक्लिनिक, यश मेडिकल जवळ,ठाकूर अपार्टमेंट, उरण शहर येथे अमन पॉलीक्लिनिक व क्वीन्स केअर क्लिनिक यांच्या संयुक्त विद्यमाने आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या आरोग्य शिबिराअंतर्गत नागरिकांची मोफत तपासणी करण्यात आली.इसीजी, बीपी, डायबेटीस, बी एम डी आदीची मोफत तपासणी या शिबिरात करण्यात आली .तर विविध रोग व त्या रोगावर उपाययोजना याबाबत मोफत मार्गदर्शन तज्ञ डॉक्टर द्वारे करण्यात आले.हेलपिंग स्टार फॉउंडेशन अंतर्गत सुरु असलेल्या अमन पॉलीक्लिनिकचे हे तिसरे वर्ष असून क्वीन्स केअर क्लिनिक यांच्या सहकार्याने आयोजित केलेल्या या आरोग्य शिबिराचा नागरिकांनी जास्तीत जास्त फायदा घेतला. या आरोग्य शिबिराला नागरिकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला.

# विलेपार्ले येथील प्रबोधनकार ठाकरे क्रिडा संकुलाच्या अनुष्का पाटीलची जुनियर जिम्नॅस्टिक्स स्पर्धेत सुवर्ण कामगिरी

**दै.रायगड नगरी । मुंबई**

प्रबोधनकार ठाकरे क्रिडा संकुल, विलेपार्ले येथील जिम्नॅस्टिक्स प्रशिक्षक विशाल कटकदौंड यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण घेणारी अनुष्का पाटील हिने नुकत्याच पार पडलेल्या जम्मू काश्मीर येथील तिच्या पाहिल्याच जुनियर नॅशनल आर्टिस्टिक जिम्नॅस्टिक्स चॅम्पियनशिप स्पर्धेत बॅलन्सिंग बीम या क्रिडा प्रकारात सुवर्ण पदकासहित महाराष्ट्रासाठी महिलांच्या सांघिक रौप्य पदकाची कमाई करत वैयक्तीक पाचवा क्रमांक गाठून खेलो इंडिया स्पर्धेत महाराष्ट्र संघात आपला पहिला प्रवेश निश्चित केला आहे.




तर मुलांच्या संघात निशांत करंदीकर आणि सार्थक राऊळ यांनीही प्रशिक्षक शुभम गिरी सोबत महाराष्ट्र संघाला रौप्य पदक मिळवून दिले आहे. प्रबोधनकार ठाकरे क्रिडा संकुलाचे अरविंद प्रभू (अध्यक्ष), डॉ. मोहन राणे (सचिव), नीलम बाबरदेसाई (जिम्नॅस्टिक्स विभागाच्या प्रमुख), पालक आणि संपूर्ण प्रबोधनकार ठाकरे क्रिडा संकुलाच्या सर्व परिवाराचे आभार आणि अभिनंदन!

# महिनाभरानंतर मुरुडमध्ये लाल परीचे दर्शन झाल्याने प्रवाशी सुखावला ; आझाद चौकात स्वागत

**दै.रायगड नगरी । मुरुड**

मुरुड मधील एस टी कर्मचारी अजूनही आपल्या मागण्यांवर ठाम असून दिवसेंदिवस संप चिघळत चालला आहे. दरम्यान प्रवाशांची अत्यंत गैरसोय होत असल्याने एस टी आगारातून बस सेवा त्वरित सुरु करण्याची मागणी मुरुड तालुका प्रवासी संघटनेचे अध्यक्ष श्रीकांत सुर्वे यांनी आगार प्रमुख सनील वाकचौरे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली होती. आगारप्रमुखांनी सांगितले कि शुक्रवारी पेण येथील विभागीय अधिकारी यांनी मुरुडमध्ये येऊन संपात सहभागी झालेल्या कर्मचाऱ्यांची समजूत घालून त्यांना कामावर हजर राहण्याचे आवाहन केले. तसेच येथील तीन कर्मचाऱ्यांचे निलंबन केले असून उर्वरित कर्मचारी त्वरित कामावर हजर न झाल्यास त्यातील २८ ते ३० कर्मचाऱ्यांचे निलंबन होण्याची शक्यता आहे.

संपातील एक वाहक कामावर हजर झाल्याने सोमवारी पेण येथील आगारातून एक चालक मागवून महिन्याभरानंतर सकाळी मुरुड अलिबाग एसटी संरक्षणात पाठवण्यात आली, सदर एसटीचे स्वागत आझाद चौक येथे मुरुड तालुका प्रवासी संघटनेचे अध्यक्ष श्रीकांत सुर्वे, इर्शाद कादरी, गोंडेकर इत्यादींनी चालक डी .ए. म्हसकर व वाहक प्रकाश दांडेकर यांना गुलाब पुष्प देऊन त्यांचे आभार व्यक्त करून केले. महिन्यांनी लाल परीचे दर्शन घडल्यानंतर प्रवाशांमध्ये आनंदाचे वातावरण होते. सध्या मुरुड आगारात एकच वाहक असून चालक उपलब्ध नाहीत. संप मिटेपर्यंत पेण, रोहा इत्यादी आगारातून चालक वाहक उपलब्ध झाल्यास आम्ही एसटी च्या फेऱ्या वाढवून सेवा सुरळीत करून प्रवाशांची गैरसोय टाळू असे आगारप्रमुख सनील वाकचौरे यांनी सांगितले.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## पाली झाप बलाप बायपास मार्ग भूसंपादन प्रक्रियेत शेतकरी आक्रमक

मुख्य उदरनिर्वाहाचे साधन असलेल्या पिकत्या जमिनीवर बुलडोजर फिरविण्याचा घाट प्रशासनाकडून घातला जात असल्याचा आरोप स्थानिक शेतकरी व नागरिकांनी केला. राज्यशासनाने सन २०१० या वर्षी या रस्त्याला मान्यता दिली आहे . तसेच रस्त्यास १८ कोटी तर भूसंपादनासाठी १० कोटींची मंजुरी मिळाली होती. सदरचा मार्ग हा पाली पाटनुस राज्यमार्ग ९ ४ ला जोडला आहे . या मार्गालगत येणाऱ्या शेकडो शेतकऱ्यांच्या पिकत्या जमिनी नष्ट होणार असल्याने शेतकरी वर्गात संतापाची लाट उसळली आहे . मनमानी प्रशासनाच्या कारभाराविरोधात शेतकऱ्यांनी दंड थोपटलेत . यावेळी शेतकरी मंगेश कदम यांनी सांगितले की सदर बायपास मार्गाकरिता यापूर्वी टाटा पॉवर ची टॉवर लाईन गेलेल्या व शिक्कामोर्तब झालेल्या भूसंपादनाला स्थगिती देण्यात आली आहे . यापूर्वी मोजणी व सर्व्हे करण्यात आला होता. मात्र काही मोजक्या धनिक लोकांचे हितसंबंध जोपासण्यासाठी सदर मार्ग वळविण्यात आला आहे , हा डाव आम्ही उधळून लावू असा इशारा कदम यांनी दिला. आमच्या बापजाद्यांनी आजवर जपलेली शेतजमीन आम्ही प्राण गेला तरी देणार नाही , सरकारने शेतकऱ्यांच्या भावनेचा विचार करावा अन्यथा उग्र आंदोलन छेडू. असा इशारा सुजित काटकर यांनी दिला.

रमेश लखीमळे यांनी सांगितले की येथील शेतकऱ्यांचे उदरनिर्वाहाचे मुख्य साधन शेती आहे . आमच्या अनेक पिढ्या शेतीवर जगल्या आहेत . आमची शेती नष्ट झाली तर आम्ही जगणार कसे , आमची मुले बाळे खाणार काय ? शेती टिकली तरच शेतकरी जगेल , सरकारने आमच्या पोटावर कुऱ्हाड मारू नये अशी विनंती काटकर यांनी केली . यावेळी जमीन आमच्या हक्काची नाही कुणाच्या बापाची अशा घोषणा देण्यात आल्या . आजघडीला नव्याने बाह्य वळण मार्गासाठी समाविष्ट केल्या जाणाऱ्या दुबार पिकी शेतजमिनीला देण्यास संबंधित जमीन मालक शेतकऱ्यांनी विरोध दर्शविल्याने प्रशासन व सरकार यावर आता नेमकी काय भूमिका घेणार याकडे साऱ्यांचे लक्ष लागले आहे . यावेळी येथील , मंगेश कदम, लक्ष्मण कांबळे, पांडू राऊत, श्रीरंग काटकर, सुजित काटकर, बाळकृष्ण लखीमले, वसंत गडगे, तुकाराम गडगे, विठ्ठल ठोंबरे, अनंत लांगी, बाळू काटकर, सुरेश गायकवाड,बाळा परब, यशवंत काटकर, उमाजी राऊत,जयंता गडगे, दत्तात्रेय गोळे, दीपक चव्हाण, सीताराम जाधव,निलेश जाधव, जितेंद्र गद्रे आदी शेतकरी उपस्थित होते.

## जिल्हा परिषद सदस्यांची संख्या वाढविण्याचा सरकारचा निर्णय

तो अर्ध्यापेक्षा कमी असेल तर, तो दुर्लक्षित करण्यात येईल.

कलम ९ च्या पोटकलम (१) च्या खंड (क) मध्ये निर्धारित केल्याप्रमाणे, कोणत्याही परिस्थितीत, निर्वाचक गटांची एकूण संख्या ८५ निर्वाचक गटांपेक्षा अधिक असणार नाही अशी सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आला.


**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या नोटीशीद्वारे जाहीर सूचना देण्यात येते की, माझे अशिल श्री.सचिन कालू वाघेला, रा.प्लॉट नं.५२४, चीनई वाडी, ३५ वा रोड, नॅशनल कॉलेज जवळ, खार (पश्चिम), मुंबई, महाराष्ट्र पिन कोड-४०००५२ यांच्या नावे खालील वर्णन केलेल्या मिळकतीचा खरेदी करारनामा दस्त क्रमांक १५७९/२०२१ त्यांच्या नकळत हरविले आहे व बराच शोध घेवून देखील त्यांना ते अद्याप पर्यंत मिळालेले नाही. सदर मिळकतीचे वर्णन

**मालमत्तेचा तपशिल**
**अपार्टमेंट नं.१४०६, चौदावा मजला, बिल्डींग नं.एल ०२, मास हौसिंग स्कीम एल.आय.जी., प्लॉट नं.१, सेक्टर ४०, खारघर, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२१० क्षेत्र २९.८२ चौ.मी.कारपेट**

वर वर्णन केलेल्या मिळकती संदर्भातील करारनामा दस्त क्रमांक १५७९/२०२१ कोणाला सापडल्यास ते नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसाच्या आत खालील पत्यावर कागदपत्रासहीत दाखल करावे. तसे न झाल्यास ते कागदपत्र गहाळ समजण्यात येईल व त्या कागदपत्रा संदर्भात कोणाकडून बेकायदेशीर काम झाल्यास त्यासाठी माझे अशिल जबाबदार नसतील याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**ॲड.सुजाता जो. पाटील**
**विसावा को.ऑ.हौ.सोसायटी**
**प्लॉट नं.ई १२४/१३, से.१२ खारघर**
**मो.नं.८८७९४१६४८३**

अर्जदाराचे वकील : सचिन पी. केणी

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.१७५९/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०७/०१/२०२२

१) श्रीमती.लिलाबाई शालिक पाटील
वय : ५४ वर्षे, व्यव : गृहिणी
२) श्रीमती.कविता विजय पाटील
वय : ३३ वर्षे, व्यव : गृहिणी
३) कुमारी.प्राप्ती विजय पाटील
वय : १६ वर्षे, व्यव : शिक्षण
४) कुमार.आर्यन विजय पाटील
वय : १४ वर्षे, वयव : शिक्षण
वरील सर्व रा.तळोजा मजकूर, ता.पनवेल, जि.रायगड ... अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही ... सामनेवाला

या जाहीर नोटीसीने तमाम जनतेस कळविण्यात ज्यापेक्षा अर्जदार क्र.१ यांचा मुलगा तसेच अर्जदार क्र.२ यांचे पती तसेच अर्जदार क्र.३ व ४ यांचे वडील कै.विजय शालिक पाटील हे दि.१९/०१/२०१८ रोजी मौजे : सेंट्रल हॉस्पिटल वाशी, नवी मुंबई येथे मयत झाले आहेत. कै.विजय शालिक पाटील यांच्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**घर मिळकतीचे वर्णन**
**पनवेल महानगपालिका हद्दीतील, मौजे : तळोजा मजकूर, ता.पनवेल, जि.रायगड**

**पनवेल महानगरपालिका हद्दीतील मौजे : तळोजा मजकूर विभाग, घर क्र.२६१, एकूण क्षेत्रफळ-२१×२१=४४१ चौ.फूट**

येणेप्रमाणे घर मिळकतीचे वर्णन असून सदरहू घर मिळकतीच्या अनुषंगाने वारस दाखला मिळणेकरिता अर्जदारांनी मे.कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

येणेप्रमाणे वारस दाखला मिळणेकरिता अर्जदारांनी मे.कोर्टात अर्ज दाखल केला आहे. वरील अर्जदार हे कै.विजय शालिक पाटील यांचे वारस नाहीत असे अगर अर्जदार यांस वारसदाखला देण्याबाबत अन्य कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी स्वतः अगर त्यांच्या वकीलामार्फत त्यांची हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह ना.कोर्टात दाखल करावी. सदर मुदतीत हरकती न आल्यास कोणाची हरकत नाही असे गृहीत धरुन ना.कोर्ट अर्जदार यांस वारसदाखला प्रदान करील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२७/११/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

वारसाचं सर्टीफिकेटबद्दल जाहीर नोटीस

ॲड.मानस मोहंती व
ॲड.योगिनी भराडे-मोहंती
अर्जदार यांचे वकील

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१७६०/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१९/०१/२०२२

१) श्री.आशिष दत्तात्रय देशपांडे
वय : ५१ वर्षे, धंदा : नोकरी
२) श्री.अमेय आशिष देशपांडे
वय : २२ वर्षे, धंदा : विद्यार्थी
३) आकांक्षा आशिष देशपांडे
वय : २० वर्षे, धंदा : विद्यार्थी
वरील १, २ आणि ३ रा.बी २/०१,
निलगिरी गार्डन्स, सेक्टर २४,
सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ... अर्जदार
विरुद्ध
निरंक ... सामनेवाला

वरील अर्जदार १ यांचे पत्नी व अर्जदार २ ते ३ यांची आई कै. श्रीमती.मंजरी आशिष देशपांडे यांचे निधन दि.०३/०८/२०१० रोजी एम.जी.एम. हॉस्पिटल, वाशी येथे झाले. यांच्या मालकीचे असलेले मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मालमत्तेचे वर्णन**
**५०% हक्क फ्लॅट नं.२०३, दुसरा मजला, भूमी टॉवर, प्लॉट नं.२८, सेक्टर नं.४, खारघर, नवी मुंबई-४१०२१०, क्षेत्रफळ ८२.५१ चौ.मी. कारपेट / ९९.००६ चौ.मी. बिल्टअप एरिया**

वरील मिळकतीबाबत अर्जदाराने वारस दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसांचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क, अधिकार, हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात दाखल करावी. वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदाराच्या विनंतीप्रमाणे वारस दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२९/११/२०२१ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**जाहीर नोटीस**

सर्व तमाम लोकांस या नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, सौ.जनता दिपक खारकर, श्री.अश्वित दिपक खारकर व परवेज आलम इजराईल शेख, रा.उलवा यांच्या नावे मौजे : पुष्पकनगर वहाळ, येथील भूखंड क्रमांक ५३१, सेक्टर २४, एकूण क्षेत्र ३४० चौ.मी. नोड पुष्पकनगर, वहाळ, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड यांचे नावे सिडकोने दि.२५/११/२०२१ च्या वाटपपत्रान्वये वाटप करण्यात आलेले आहे. तरी आमचे अशिल श्री क्रिष्णा बिल्डर्स तर्फे भागीदार श्री.जयेश नरोत्तम गोहील व श्री.मुकेश नांजीराम कुमार यांनी खाली वर्णन केलेली मिळकत भूखंड हा त्या मिळकतींचे विद्यमान मालक / भाडेपट्टेदार यांचेकडून सिडकोकडून त्रिपक्षीय भाडेपट्टा हस्तांतरण करारनाम्याद्वारे हस्तांतरीत खरेदी करण्याचे ठरविले आहे.

| नोड | भूखंड क्रमांक | सेक्टर नंबर | क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|---|
| पुष्पकनगर, वहाळ, ता.पनवेल, जि.रायगड | ५३१ | २४ | ३४० |

तरी सदर मिळकतीवर विद्यमान मालक यांचे शिवाय इतर अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, करार मदार, लीन, लीज, गहाण, दान, विकसन करार, कुलमुखत्यारपत्र, साठेखत, विसारपावती, खेदीखत, पोटगी, ताबा, वहिवाट वा तत्सम प्रकारचा हक्क, बोजा, कसलाही हक्क हितसंबंध अथवा हरकती असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकती, संबंधीच्या कागदपत्री पुराव्यासह, आपली हरकत खाली सही करणार यांचेकडे ही सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांचे आत आमचे खालील पत्यावर मुळ कागदपत्रांसह येवून आमची खात्री पटवून द्यावी. अन्यथा सदर मिळकतीवर विद्यमान मालकांशिवाय अन्य कोणाचाही, कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास त्यांनी तो जाणीवपूर्वक सोडून दिला आहे, असे समजून आमचे अशिल भूखंड हस्तांतरणाचा पुढील व्यवहार पूर्ण करतील. संपूर्ण उपभोग घेण्याचा आमचे अशिलांना अधिकार राहील.

त्यानंतर कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही. तसेच सदर मिळकत निर्वेध असल्याचा दाखलाही दिला जाईल. मुदतीनंतर आलेली हरकत ग्राह्य धरली जाणार नाही, याची नोंद घ्यावी. हे सर्वांस कळावे.

**सही/-**
**ॲड.तृप्ती सुर्यकांत राऊत**
**कार्या. पत्ता : शॉप नं.२, शिवधाम, सेक्टर १९, प्लॉट नं.२०, उलवे, तालुका : पनवेल, जि.रायगड**
**मोबाईल नं.९९८७२५८७१२**


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

## संक्षिप्त...

### २ लाख ७० हजार रुपये किंमतीच्या सहा टायरसह डिस्कची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

अज्ञात चोरट्याने २ लाख ७० हजार रुपये किंमतीच्या सहा टायर्ससह डिस्कची चोरी केल्याची घटना पनवेल जवळील कोळखे गाव येथील एका गॅरेजमध्ये घडली आहे.

मनोज पासवान (४८) यांचे सुनील मोटार्स गॅरेज असून त्या ठिकाणी १४ टायर असलेली टाटा टोरस मॉडेल या नवीन गाडीची बॉडी बनविण्याकरिता ठेवली होती. सदर गाडीचे पाठीमागील ६ टायर डिस्कसह अज्ञात चोरट्याने चोरुन नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# महिसदरा पुलावरील रस्त्याला जीवघेणे खड्डे

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

पुई पेट्रोल पंपाच्या बाजूला छोटासा पूल आहे. या पुलाच्या रस्त्यावर मोठे मोठे खड्डे असून हे जीवघेणे खड्डे अत्यंत धोकादायक असल्याने दुचाकी आणि चारचाकी वाहन चालकांच्या जीवाशी खेळणारे खड्डे असल्यामुळे वाहनचालकांना जीव वाचवून तेथून मार्ग काढावा लागत असल्यामुळे अनेकांनी संताप व्यक्त केला आहे.

खड्ड्यांच्या याबाबतीत रायगड जिल्हा अग्रेसर आहे. वास्तविक मुंबई गोवा महामार्गावर असलेले हे खड्डे बळी घेण्याची वाट पाहत आहेत काय ? असा ज्वलंत प्रश्न नागरिकांना पडला आहे. पुई येथील समाजसेवक श्री. निलेशभाई महाडिक यांनी पत्रकारांना सांगितले मुंबई महामार्गावरील हे रस्ते आहेत की खड्ड्यातील रस्ते असा



ज्वलंत प्रश्न दरवर्षी रस्त्यावर जे जीवघेणे खड्डे पडतात याला कोणीही जाब विचारत नाही. एकतर पनवेल ते इंदापूर रस्ता रुंदीकरणाचे काम रखडलेले आहे त्यात हे जीवघेणे खड्डे असे किती वर्षे चालणार ? किती जणांचे बळी घेणार असे सांगून निलेश महाडिक म्हणाले की रस्त्यांबाबत सुधारणा न झाल्यास मी स्वतः माझ्या सहकार्या समवेत रस्त्यावरच ठिय्या आंदोलन करून उपोषणास बसेन. या बाबत तहसिलदार जिल्हाधिकारी यांना रितसर निवेदन देऊन आंदोलन छेडणार असल्याचे सांगितले.

वास्तविक दहा मिटर पर्यंत पडलेले भलेमोठे खड्डे बुजविण्यास किती वेळ लागणार आहे. मात्र त्याच खड्ड्यात जीव जाण्यास फारसा वेळ लागणार नाही. या जीवघेण्या खड्ड्यांतून प्रवास करणाऱ्या नागरिकांना, तसेच वाहन चालकांना दररोज मोठा त्रास सहन करून रस्ता पार करावा लागत असल्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

# डिसेंबर आला कालव्याची प्रतिक्षा, साफसफाई डागडुजी यांत्रीकपणे उरकु नका : माणगांवकर

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

माणगांव तालुक्यातील कालवा शेतकऱ्यांसाठी वरदानच आहे. दरवर्षी प्रमाणे डिसेंबर च्या पहिल्या पंधरवड्यात कालवा सुरु होतो. उन्हाळी हमखास पिक देणारी शेती महत्वाची आहे. तसेच काही भागात नागरिकांची तहान भागविणारा, काळनदीची पाणी पातळी व माणगांवचा पाणीपूरवठा, विंधन विहीरीं, जलस्त्रोतांना लाभदायी, परिसरातील कडधान्य शेती, पर्यावरणाला पोषक बहुपयोगी कालवा सुरु होणार याची सर्वांना आतुरता लागली आहे. यंदातरी कालवा साफ-सफाई डागडुजी यांत्रीकपणे उरकु नका अशी बळीराजासह माणगांवकरांची माफक अपेक्षा आहे.



यंदा चक्रीवादळ, अवकाळी पावसामुळे शेतीचे फार मोठे नुकसान झाले. आता पुन्हा एकदा उन्हाळी शेतीवर चांगले पिक घेण्यासाठी शेतकरी वर्गाला कंबर कसावी लागेल. गतवर्षी शहरातील कालवारस्ता डांबरीकरण झाल्याने तो उखडण्याचे कारणास्तव कामात उदासिनता दिसली, वरकरणीच साफ-सफाई उरकली. आता तरी पूर्वी प्रमाणे काळप्रकल्पाचे कामगार लावुन व्यवस्थित साफसफाई करावी अशी जनतेची माफक अपेक्षा आहे. पूर्वी जलसंपदा काळ प्रकल्प विभागाचे कामगार वर्षभर कालव्याची दुतर्फा सफाई, डागडुजी करत, आता मजुरांचा प्रश्न निर्माण झाला आहे. उदासिनता, दुर्लक्षाने अनावश्यक वाढलेले गवत, मोठी झाडे यांच्या मुळां मुळे कालवा बंधारे गळतीची शक्यता वाढू शकते. खेकडे जमिनीत भोक पाडून बंधारे फुटतात. यासाठीच दुतर्फा सफाई महत्वाची ठरते.

उतेखोल येथील कालवा शहरातून वाहत आहे. या ठिकाणी साधारणतः पाचशे मिटर कालवाबंधारे काँक्रीटीकरन करुन, ही दरवर्षी निर्माण होणारी गळती समस्या दूर केली जावु शकते. २५ जाने.२०२१ रोजी राज्याचे जलसंपदा मंत्री ना. जयंत पाटील माणगांव येथील जलसंपदा कार्यालयाचे लोकार्पण सोहळ्यासाठी आले असता त्यांनी काळनदीवरील बंधाराची मागणी पूर्तता व शहरातून वाहणाऱ्या कालव्याची दूतर्फा बांधकाम करुन किंवा कालव्याचे पाणी बंद पाइप लाईन किंवा बंधिस्त कालवा बांधकाम करण्याचे सक्त आदेश दिले होते, त्याचे काय झाले? याबद्दल माणगांवकर आश्चर्य व्यक्त करत आहेत. बहुपयोगी व शहराचे सौंदर्यात भर टाकणारा कालवा दुर्लक्षित का? रायगडच्या पालकमंत्री व खासदार सुनिल तटकरे याकडे लक्ष वेधतिल का? असा सवालही उपस्थित होत आहे.

कचरा टाकून कालव्याचे गटांर करण्याचे काम येथिल काही लोक करतात ! मात्र नगरपंचायत गप्प का? याचा राग व खंत देखिल व्यक्त केली जाते. सफाईचे काम चांगले व्हावे यासाठी प्रयत्न करणारे जुने जाणते कर्मचारी अधिकारी आहेत. पण राजकीय दबाव येतो. प्रामाणिकपणे काम करण्याचे दिवस आता संपले.

कंत्राटी पद्धतीने यांत्रीकपणे काम करुन घेतले जाते. यावर कोणाचा अंकुश सुपरव्हीजन उरले नाही. बिलं काढून मोकळे होतात, रोजगार संपला अस लोक बोलतात. कामां बाबत कोणतीही हमी नाही. माणगांव शहराच्या सौंदर्यात भर घालणारा कालवा आपल्या गतकालीन अच्छे दीन च्या प्रतिक्षेत आहे. शासनाच्या संबंधितानी वेळीच लक्ष घालावे अशी मागणी शेतकरी वर्गासह जनते मधुन होत आहे.

# खारघर मधील संजीवनी स्कूल तर्फे 'ई कचरा कलेक्ट' मोहीम

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पर्यावरण संवर्धनासाठी सर्व पातळीवर अनेक उपाययोजना आखल्या जात आहेत. मात्र, दिवसेंदिवस पर्यावरणाचे संतुलन बिघडण्यासाठी ई-कचरा मोठ्या प्रमाणात कारणीभूत ठरत आहे. पर्यावरण रक्षणसाठी आता ई-कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी जनजागृतीची आवश्यकता असल्याने खारघर मधील संजीवनी इंटर नॅशनल स्कूल प्रशासनाने विद्यार्थ्यांद्वारे स्कूल परिसरातील ई कचरा गोळा करण्याचा नाविन्यपूर्ण उपक्रम हाती घेतल्यामुळे संजीवनी इंटर नॅशनल स्कूल प्रशासनाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

संयुक्त राष्ट्रांच्या अहवालानुसार, १.७ दशलक्ष टन इलेक्ट्रॉनिक आणि विद्युत उपकरणे टावून भारत जगातील पाचव्या क्रमांकाचा ई- कचरा उत्पादक आहे. भारत देशात मोठ्या प्रमाणात ई-कचरा निर्माण होत होत असून, योग्य विल्हेवाट न लावल्यामुळे पर्यावरणासह आरोग्यालाही मोठा धोक्का निर्माण झाला आहे.

शालेय विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती व्हावी तसेच नवीन पिढीमध्ये इलेक्ट्रॉनिक कचऱ्याचे होणारे घातक परिणाम या संदर्भात जनजागृती करण्यासाठी संजीवनी इंटर नॅशनल स्कूल प्रशासनाने इलेक्ट्रॉनिक कचऱ्याचा धोका नियंत्रित करण्यासाठी आणि हवामान कृती प्रकल्पाचा एक भाग म्हणून, 'संजीवनी इंटरनॅशनल स्कूल'च्या मुख्याध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. वंदना सक्सेना आणि निशिगंधा देवरे (क्लायमेट ॲक्शन प्रोजेक्ट कोऑर्डिनेटर) यांनी विद्यार्थ्यांकडून इलेक्ट्रॉनिक कचरा गोळा करण्याची मोहीम सुरु केली आहे.

या मोहिमेत विद्यार्थ्यांनी त्यांच्या घरातून आणि परिसरातून ई-कचरा गोळा केला करुन स्कूल मध्ये जमा केला. गोळा केलेल्या वस्तूंमध्ये प्रिंटर, लॅपटॉप, जुने फोन, इअर फोन, चार्जर, कॉम्पॅक्ट डिस्क आदींचा समावेश आहे. या मोहीममध्ये विद्यार्थी-विद्यार्थिनींचा सहभाग असून, या मोहीमेला पालकांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे.

---

राव साहेब
प्रोसेस जमा ता.१००/-
पनवेल

अ‍ॅड.केदार नि. सोमण
अर्जदारांचे वकील

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश क.स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.१६९१/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१२/०१/२०२२

१) श्री.आमीर अजगरअली भारमल
वय : २१ वर्षे, धंदा : व्यवसाय
२) श्रीमती.फातीमा अजगरअली भारमल
वय : ५३ वर्षे, धंदा : गृहिणी
३) कु.सभा अजगरअली भारमल
वय : १५ वर्षे, धंदा : शिक्षण
रा.रुम नं.६ ए गांधी अपार्टमेंट, प्लॉट नं.८२८,
दुसरा मजला, पनवेल, रायगड-४१०२०६ — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै. असगरअली हतीमभाई भारमल यांचे निधन सुअस्थ हॉस्पिटल रोडपाली, ता.पनवेल येथे दि.०५/०४/२०२१ रोजी झाल्याने कै.असगरअली हतीमभाई भारमल यांच्या मालकीच्या खालील वर्णनाच्या मिळकतीचे वारसापत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**१) पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड यांच्या हद्दीतील सदनिका क्र.६, गांधी अपार्टमेंट, प्लॉट नंबर-८२८, दुसरा मजला, महात्मा गांधी रोड, पनवेल ही निवासी सदनिका, क्षेत्र ६१० चौ.मी. (बिल्टअप) अशा वर्णनाची निवासी सदनिका.**

**२) पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड, यांच्या हद्दीतील सिटी सर्व्हे नंबर २२/१, सदनिका क्र.१०३, ए-विंग, पहिला मजला, २०० चौ.फूट कारपेट क्षेत्र**

**३) पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड, यांच्या हद्दीतील सिटी सर्व्हे नंबर २२/१, गाळा क्र.२, तळमजला, २७५ चौ.फूट कारपेट क्षेत्र**

वर श्री.आमीर अजगरअली भारमल वगैरे हे कै.असगरअली हतीमभाई भारमल यांचे कायदेशीर वारस आहेत. ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट श्री.आमीर अजगरअली भारमल वगैरे यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै.असगरअली हतीमभाई भारमल यांच्या वारस पत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.२६/११/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

मा.भाकरे साहेब यांचे कोर्ट

अर्जदारातर्फे वकील
अ‍ॅड.निलम पाटील-मुंडकर

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर), पनवेल यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१८०६/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२८/०१/२०२२

१) श्रीमती.चंद्रभागा तुलशीराम पाटील
वय : ५८ वर्षे, धंदा : घरकाम
२) सौ.शितल संदीप मढवी
वय : ३७ वर्षे, धंदा : घरकाम
रा.मु.तरघर, पो.उलवे, ता.पनवेल, जि.रायगड
३) श्री.तुषार तुलशीराम पाटील
वय : ३५ वर्षे, धंदा : नोकरी
१ व ३ रा.मु.पो.गव्हाण, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, सदर अर्जदार क्र.१ यांचे पती म्हणजेच अर्जदार क्र.२ आणि ३ यांचे वडील तुलशीराम सिताराम पाटील हे दि.०८/०७/२०१६ रोजी मयत झाले आहेत. सदर मयत तुलशीराम सिताराम पाटील यांच्या वडिलोपार्जित सामाईक मालकीच्या मौजे : गव्हाण, ता.पनवेल येथील पुढीलप्रमाणे वर्णनाच्या जमीन मिळकती महाराष्ट्र शासनातर्फे सिडको लिमिटेड ''नवी मुंबई'' प्रकल्पाकरिता संपादीत केली आहे.

**संपादीत मिळकतीचे वर्णन**
**मौजे : गव्हाण, ता.पनवेल, जि.रायगड येथील**

| युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पै |
|---|---|---|---|---|
| गव्हाण-७४५ | ३५० | ० | ०-७२-६ पो.ख.०-४-३ | ३-८ |
| गव्हाण-७४५ | ३३७ | ३ | ०-०६-१ पो.ख.०-०-२ | ०-५३ |

वर नमूद संपादीत मिळकतींचे संपादनापोटी अर्जदारांस मौजे : उलवे, ता.पनवेल येथील सेक्टर-१९ मधील भूखंड क्र.३३७ हा ७०० चौ.मी. क्षेत्राचा भूखंड वाटप करण्याचे इरादीत करण्यात आलेले आहे. आता वर नमूद भूखंड वाटप करण्यासंबंधी अर्जदारांनी सिडको कार्यालयात चौकशी केली असता त्यांस सक्षम कोर्टातून मयतांचा वारस दाखला आणण्याकरिता सांगितले. सबब सदर अर्जदारांनी ते मयत तुलशीराम सिताराम पाटील यांचे वारस असल्याबाबत वारसदाखला मिळण्याकरिता मे.कोर्टात अर्ज केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जदार यांस त्यांचे मागणी प्रमाणे वारस दाखला देणेस कुणाचीही हरकत असल्यास अशा इसमाने त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे.कोर्टात सादर करावी. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास या अर्जदारांस त्यांचे विनंतीप्रमाणे वारस दाखला दिला जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.२९ माहे नोव्हेंबर सन २०२१ रोजी माझ्या सहीने व मे.कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

अर्जदाराचे वकील
अ‍ॅड.मच्छिंद्रनाथ आ. घरत

## जाहीर नोटीस

उरण येथील मे.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.२०६/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१०/०१/२०२२

१) श्री.मच्छिंद्रनाथ काशिनाथ घरत
वय : ५१ वर्षे, व्यवसाय : नोकरी
रा.प्लॉट नं.०५, बिल्डींग नं.२, नवीन पनवेल,
ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६
२) श्री.नारायण काशिनाथ घरत
वय : ४६ वर्षे, व्यवसाय : नोकरी
रा.भेंडखळ, ता.उरण, जि.रायगड-४००७०२
३) श्रीमती.पुष्पा प्रवीण ठाकूर उर्फ काशिनाथ घरत
वय : ५२ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.बेलपाडा, ता.उरण, जि.रायगड-४००७०२
४) श्रीमती.यामिनी मोहन पाटील
उर्फ यामिनी काशिनाथ घरत
वय : ४१ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.करंजा, कोंढरीपाडा, ता.उरण, जि.रायगड-४००७०२ — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै. काशिनाथ विश्वनाथ घरत यांचे निधन रा.मु.पो.भेंडखळ, ता.उरण, जि.रायगड येथे झाले आहे. अर्जदार हे कै.काशिनाथ विश्वनाथ घरत यांचे कायदेशीर वारस आहेत. कै.काशिनाथ विश्वनाथ घरत यांच्या सामाईक नावे असलेली खालील वर्णनाची मिळकत महाराष्ट्र शासनाने सिडकोकरिता भूसंपादीत केलेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : काळाधोंडा, ता.उरण, जि.रायगड**

| अ.क्र. | गावाचे नांव व युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| १ | मौजे : भेंडखळ २७०/८३ | २७९ | ३ | ०-०३-४ |
| २ | | २४७ | २ | ०-०५-१२ |
| ३ | | २४७ | ४ | ०-०८-० |
| ४ | | २५१ | ३ | ०-०७-१२ |
| ५ | | २५२ | १२ A | ०-०६-४ |
| ६ | | २६३ | ३ | ०-१८-१२ |
| ७ | | २६८ | ५ | ०-०५-१२ |
| ८ | | २६८ | १० | ०-०३-४ |
| ९ | | २७१ | IA | ०-०४-८ |
| १० | | २७९ | ५ | ०-०६-० |
| ११ | | २८० | २ | ०-११-१२ |
| १२ | | २८५ | २ | ०-०६-८ |
| १३ | | २८६ | १० | ०-०४-४ |
| १४ | | २९२ | ८ | ०-०९-० |
| १५ | | २९५ | १० | ०-०४-४ |
| १६ | | २९८ | १ | ०-१३-४ |
| १७ | | ३०८ | ३ | ०-०९-० |
| १ | मौजे : भेंडखळ ८५/८६/८८ | २४० | ११ | ०-२-० |
| १ | मौजे : भेंडखळ १६५ | १७४ | ८ | ०-२-१२ |

वरील मिळकतीमध्ये वर दिलेले अर्जदार क्र.१ ते ४ हे कै.काशिनाथ विश्वनाथ घरत यांचे वारस असून त्यास आणखी कोणीही वारस नाहीत. अर्जदार यांनी आपणास सदर कामी वारस असल्याचा दाखला मिळावा म्हणून ना.कोर्टात प्रस्तुतचा अर्ज दिलेला आहे. तरी अर्जदार यांच्या वारस असल्याच्या हक्काबद्दल कोणीही व्यक्तीस हरकत देण्याची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून अगर वकीलांमार्फत न्यायालयात हरकत न घेतल्यास ना.कोर्ट तत्संबंधी योग्य पुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील. मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत.

आज दि.२५/११/२०२१ रोजी सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी सदरची जाहीर नोटीस दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.क.स्तर, उरण**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.क.स्तर, उरण**

---

मा.गोडसे सो

अ‍ॅड.शशिकांत काळू म्हात्रे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१६६३/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.१२/०१/२०२२

१) श्री.शैलेश लक्ष्मण म्हात्रे
वय : ४५ वर्षे, धंदा : व्यवसाय
२) श्री.सचिन लक्ष्मण पाटील
वय : ४३ वर्षे, धंदा : व्यवसाय
३) कै.अविनाश लक्ष्मण म्हात्रे (मयत) यांचे वारस
३/१) श्रीमती.सुजाता अविनाश म्हात्रे
वय : ४६ वर्षे, धंदा : गृहिणी
३/२) कु.जयमाला अविनाश म्हात्रे
वय : २५ वर्षे, धंदा : शिक्षण
३/३) कु.कृतिक अविनाश म्हात्रे
वय : २२ वर्षे, धंदा : शिक्षण
१ ते ३/३ रा.नावडे, ता.पनवेल, जि.रायगड
४) सौ.राजश्री दिपक म्हात्रे
वय : ४८ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.बोनकोडे, ता.जि.ठाणे — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाले

ज्याअर्थी अर्जदार नं.१ व २ आणि ४ यांचे वडील अर्जदार नं.३/१ यांचे सासरे, अर्जदार नं.३/२ ते ३/३ यांचे आजोबा, कै.लक्ष्मण जोमा पाटील उर्फ म्हात्रे हे दि.०५/०८/२०२१ रोजी मौजे : नानवटी हॉस्पिटल मुंबई, येथे मयत झाले आहे. तसेच त्यांची आई कै.फसुबाई जोमा म्हात्रे ह्या दि.०८/११/२००४ रोजी मौजे : नावडे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथे मयत झाल्या आहेत. कै.लक्ष्मण जोमा पाटील उर्फ म्हात्रे ह्यांची पत्नी कै. जनाबाई लक्ष्मण पाटील उर्फ म्हात्रे या दि.१८/०७/२०२१ रोजी रिलायन्स हॉस्पिटल कोपरखैरणे, नवी मुंबई येथे मयत झाल्या आहेत. तसेच कै.लक्ष्मण जोमा पाटील उर्फ म्हात्रे ह्यांचा मुलगा हा दि.११/०८/२०२१ रोजी मौजे : सुखम हॉस्पिटल करंजाडे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथे मयत झाले आहे.

कै.लक्ष्मण जोमा पाटील उर्फ म्हात्रे नावे असलेल्या तसेच ताबेकब्जातील व सामाईक मालकीच्या असलेल्या खालील वर्णनाच्या मिळकती आहेत.

**मिळकतीचे वर्णन (अ)**

| मौजे | युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| नावडे | ११ ई / ८९ | १९१ | २+३ | ०-४१-३ |
| | ४३ | १६१ | २ | ०-४५-५ |
| | ११ अे | ७ | १+३ | ०-५१-० |
| | ११ अे | ११ | २ | ०-०७-८ |

सदरच्या मिळकती ह्या नवीन मुंबई प्रकल्पाकरिता सिडकोने संपादीत केल्या आहेत. सदर मिळकतीचा अ‍ॅवॉर्ड हा कै.लक्ष्मण जोमा पाटील उर्फ म्हात्रे यांच्याच नावाने प्रसिद्ध झालेला आहे. सदर वर नमूद मिळकतीत कै. लक्ष्मण जोमा पाटील उर्फ म्हात्रे त्यांचे पश्चात त्यांचे वारसदार या नात्याने अर्जदार यांचा सामाईक हिस्सा आहे.

**मिळकतीचे वर्णन (ब)**

मौजे : मोर्बे, ता.पनवेल, जि.रायगड येथील सामाईक मिळकती कै. लक्ष्मण जोमा पाटील उर्फ म्हात्रे व त्यांचे भाऊ नारायण जोमा म्हात्रे यांच्या सामाईक मिळकती आहेत.

| मौजे | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| मोर्बे | ८७ | २ | ०-४७-१७ | ४.५० |
| मोर्बे | १०२ | २ अ | ०-०७-५० | ०.८० |
| मोर्बे | १२९ | ५ | ०-६२-८३ | ७.३१ |
| मोर्बे | १३३ | २ | ०-४२-१७ | ४.७५ |
| मोर्बे | १२५ | ७ | ०-११-८४ | १.६२ |
| मोर्बे | १२९ | १ | ०-२७-१७ | ३.१९ |
| मोर्बे | १२९ | ३/अ | ०-००-८३ | ०.०८ |
| मोर्बे | १२५ | २/४ | ०-१८-५० | २.५३ |

**मिळकतीचे वर्णन (क)**
**मौजे : कुणेनामा, ता.मावळ, जि.पुणे**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (आर. चौ.मी. बिनशेती) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| कुणेनामा | ८८/५/३/८८/६/८ ९ प्लॉट नं.२१ | ९-०९-०० | ०० |

खालील वर्णनाच्या घर मिळकती ह्या पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील आहेत.

**मिळकतीचे वर्णन (ड)**
**मौजे : नावडे, ता.पनवेल, जि.रायगड**

| मौजे | घर क्र. | क्षेत्र |
|---|---|---|
| नावडे | ९२ | १०९२ चौ.फूट |
| नावडे | ४५८/अ | २३४ चौ.फूट |
| नावडे | १२६ | १०५० चौ.फूट |
| नावडे | ५५७ तळमजला +३+४ | ६३०० चौ.फूट |

सदरच्या मिळकती ह्या नवीन मुंबई प्रकल्पाकरिता सिडकोने संपादीत केल्या आहेत. सदर मिळकतीचा अ‍ॅवॉर्ड हा कै.लक्ष्मण जोमा पाटील उर्फ म्हात्रे यांच्याच नावाने प्रसिद्ध झालेला आहे.

तसेच वर नमूद केलेल्या मिळकतीबाबत कै.लक्ष्मण जोमा पाटील उर्फ म्हात्रे यांचे वारसदार या नात्याने कै.लक्ष्मण जोमा पाटील उर्फ म्हात्रे यांचे हिश्श्याचे सरकारकडून मिळणारे किंवा सिडकोकडून मिळणारे १२.५ टक्के भूखंड तसेच इतर आर्थिक फायदे मिळवून घेण्याकरिता अर्जदार यांना तसा वारसदाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी दि.चौ.अर्ज पनवेल येथील मे.सह दिवाणी न्या.व.स्तर यांच्या कोर्टात दाखल केलेला आहे.

सदर वर नमूद केलेल्या मिळकतीतील कै.लक्ष्मण जोमा पाटील उर्फ म्हात्रे यांचे हिश्श्यास अर्जदार हे वारसदार असल्याबाबत अर्जदार यांचे नावाने वारसदाखला देण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारस दाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

आज दि.२७/११/२०२१ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# संक्षिप्त...

## कपडे खरेदी करण्याच्या बहाण्याने ५० हजाराची फसवणूक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कपडे खरेदी करण्याच्या बहाण्याने दुकानात शिरलेल्या एका भामट्याने २५ हजार रुपये किंमतीचे ५० ड्रेस घेवून पैसे न देता तो पसार झाल्याची घटना खारघर वसाहतीमध्ये घडली आहे.

मोनिका सदानी यांचे खारघर वसाहतीमध्ये एम.एफ.सी हे ब्युटीक असून या ठिकाणी एक भामटा दुकानात कपडे खरेदी करण्याच्या बहाण्याने गेला होता. घरी पाहुणे आले असून त्यांना कपडे पाहिजेत असे सांगून त्याने वेगवेगळ्या प्रकारचे कपडे काढायला सांगितले व त्यातील ५० ड्रेस निवडून बिल बनविण्यास सांगितले. त्यानुसार मोनिका यांनी २५ हजाराचे बिल बनवून त्यांच्याकडे कामाला असलेल्या इसमाकडे दिले. कपडे दिल्यानंतर सदर भामट्याने त्या इसमाला पैसे देण्याच्या बहाण्याने दुकानाच्या बाहेर नेले. त्यानंतर त्याच्याकडून कपडे घेवून त्याला पैसे न देता रिक्षामधून पसार झाला. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच मोनिका सदानी यांनी याबाबत खारघर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

## चिरनेर - कातळपाडा येथील दत्त मंदिराच्या पुनर्बांधणीचे काम अंतिम टप्प्यात

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील चिरनेर – कातळपाडा येथील २२ वर्षापूर्वीचे जुने दत्त मंदिर पाडण्यात आले असून,त्याची नव्याने पुनर्बांधणीचे काम मागील काही महिन्यांपासून युद्धपातळीवर सुरू आहे.सदरचे काम कातळपाडा ग्रामस्थांच्या पुढाकाराने करण्यात येत असून,हे काम अंतिम टप्प्यात आले आहे. १७ डिसेंबर २०२१ रोजी यंदाचा श्री दत्त जयंती उत्सव सोहळा आहे.त्या अनुषंगाने मंदिराच्या रंगरंगोटीच्या कामाची जोरदार तयारी सुरू आहे.८ डिसेंबर पासून सुरू होणाऱ्या दत्त जयंतीच्या धार्मिक विधीसाठी हे मंदिर पुन्हा एकदा नव्या डौलाने उभे करण्यात कातळपाडा ग्रामस्थ सरसावले आहेत. लोकवर्गणीतून आकारात येत असलेल्या या दत्त मंदिराचे कोरीव काम आणि नवा साज येथून जाणाऱ्या प्रत्येकाचे आकर्षण बनले असुन हे काम सर्वांनाच सुखावणारे दिसत आहे.त्यामुळे या कामात येथील बांधकाम समितीचे पदाधिकारी व सदस्य आणि ग्रामस्थ मंदिराच्या कामात अधिक मेहनत घेत आहेत.


### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


# पुन्हा एकदा फडके नाट्यगृहात हाऊसफुल्लची झळकली पाटी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

जागतिक कोरोना महामारीच्या संकटामुळे मागील दिड वर्षात कलाकारांनी खूप सहन केले. कोरोनामुळे उद्भवलेल्या लॉकडाऊनच्या परिस्थितीमुळे जवळपास दीड वर्षापासून कलाक्षेत्र पूर्णपणे ठप्प होते. परंतु कोरोनाच्या दुसऱ्या लाटेनंतर परिस्थिती नियंत्रणात आल्याने पुन्हा एकदा कलाकारांना रंगभूमीची सेवा करण्याचे भाग्य लाभले. आजवर कलाकारांना एक गैरसमज होता की, आमच्यामुळे प्रेक्षक येतात; परंतु आज उद्भवलेल्या या परिस्थतीमुळे ही जाणीव झाली की, प्रेक्षक येतात म्हणूनच कलाकार आहेत. कालावंताची कला जिवंत ठेवण्यासाठी मायबाप प्रेक्षकांचे आशीर्वाद अत्यंत गरजेचे आहेत, असे प्रतिपादन जेष्ठ निर्माता, दिग्दर्शक, गायक व निवेदक अशोक हांडे यांनी केले. ते पनवेल येथे आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात 'मराठी बाणा'च्या कार्यक्रमाप्रसंगी बोलत होते.




कोरोना विषाणुमुळे उद्भवलेल्या संसर्जन्य रोगाचा प्रबंध व नियंत्रण उपाय म्हणून पनवेल महानगरपालिका क्षेत्र तसेच संपूर्ण राज्यात खबरदारीचा उपाय म्हणून नाट्यगृह संपूर्णपणे बंद ठेवण्यात आले होते. परंतु कोरोनाने राज्यातून काढता पाय घेतल्यानंतर २२ ऑक्टोबर २०२१ पासून नाट्यगृहे पुन्हा सुरु करण्यात आली. राज्यसरकारच्या परवानगीनंतर नाट्यमंदिरांचे दरवाजे खुले करण्यात आल्याने कलाकारांसह रसिक प्रेक्षकांमध्येही उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. परंतु अद्यापही कोरोनाचे संकट पूर्णपणे टळलेले नसल्याने सशर्त शिथील–तेसह नाट्यगृहात प्रेक्षकांना आसनक्षमतेच्या ५०% परवानगी देण्यात आली आहे. परिणामी कलाकारांचे मानधन, प्रवास खर्च, जाहिरात, बॅकस्टेज कलाकारांचे मानधन आदी बाबींचा खर्च १००%; परंतु कार्यक्रमाचे बुकिंग मात्र ५०% यामुळे अद्यापही पूर्वीप्रमाणे कार्यक्रमांचे आयोजन करणे निर्माते व आयोजकांना परवडण्यासारखे नाही.

२२ ऑक्टोबरपासून नाट्यगृहे खुली झाल्यानंतर पनवेलमधील फडके नाट्यगृहात पहिल्यांदाच मराठी बाणा या दिमाखदार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ५०% आसन क्षमतेच्या मर्यादेचे पालन करीत व कोरोनाचे सर्व नियम काटेकोरपणे पाळून पनवेलकर रसिकांनी हाऊसफुल्ल उपस्थितीत कार्यक्रमाला भरघोस प्रतिसाद दिला. कोरोनाकाळात नैराश्येच्या गर्तेत अडकलेल्या लोकांना पुन्हा एकदा मनोरंजनाचा मनमुराद आस्वाद घेता आल्याने प्रेक्षकांच्या चेहऱ्यावर एकप्रकारे समाधान दिसुन आले. तर कार्यक्रमाला प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद पाहता कलाकारांमध्ये देखील चैतन्य व उत्साहाचे वातावरण दिसून आले.

यावेळी मराठी बाणाकार अशोक हांडे यांनी कोरोनाकाळानंतर पुन्हा एकदा पूर्वीप्रमाणेच कार्यक्रमाला हाऊसफुल्ल प्रतिसाद देणाऱ्या प्रेक्षकांचे शब्दसुमनांनी आभार मानले. तसेच यापुढेही कलाकारांना भरभरून दाद देण्यासाठी वारंवार नाट्यगृहात यावे व सर्व कार्यक्रमांना भरघोस प्रतिसाद द्यावा, असे आवाहनही 'मराठी बाणा'कार अशोक हांडे यांच्यावतीने करण्यात आले. यावेळी उपस्थित रसिक प्रेक्षकांनी मराठी बाणाचा महाकलाविष्कार नेत्रात साठवून घेतला आणि पनवेलमध्ये लवकरच पुन्हा एकदा कार्यक्रमाचे आयोजन करण्याची विनंती केली.

## नागोठण्याला पाणीपुरवठा करणारी एमआयडीसीची जलवाहिनी फुटली

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

नागोठणे शहराला पाणी पुरवठा करणारी एमआयडीसीची मुख्य जलवाहिनी नागोठण्याजवळच असलेल्या वरवठणे गावाच्या हद्दीतील शेतात सोमवारी (दि.२९) पहाटेच्या सुमारास फुटली आहे. ही जलवाहिनी फुटल्याने नागोठण्याच्या काही भागातील पाणीपुरवठा बंद झाला आहे. त्यामुळे या जलवाहिनीवर अवलंबून असलेल्या नागरिकांना विशेष करुन महिलांना पाण्यासाठी विहीरींवर व इतर ठिकाणी जावे लागले.



नागोठणे शहराला पाणीपुरवठा करणारी एम.आय.डी.सी. ची ही मुख्य जलवाहिनी वरवठणे गावाच्या हद्दीतील शेतकऱ्यांच्या शेतामधून आली आहे. यापूर्वीही ही जलवाहिनी अनेकवेळा फुटल्याने नागोठण्यातील पाणीपुरवठा बंद झाला होता. या जलवाहिनीची नागोठणे ग्रामपंचायतीकडून वारंवार दुरूस्ती करण्यात आली आहे. याआधीही एक वेळेस या जलवाहिनीचे सहा ते सात पाईप बदलण्यात आल्याने आता हा प्रश्न कायमचा मार्गी लागल्याचे वाटले होते. मात्र पुन्हा एकदा ही जलवाहिनी एका नवीन ठिकाणीच फुटल्याचे दिसून आले आहे.

दरम्यान नागोठणे शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या या मुख्य जलवाहिनीच्या दुरुस्तीचे काम सुरू करण्यात आले असून लवकरात लवकर हे काम पूर्ण करुन नागोठण्यातील पाणीपुरवठा पूर्ववत सुरु करण्यात येईल असा विश्वास नागोठण्याचे सरपंच डॉ. मिलिंद धात्रक यांनी व्यक्त केला आहे.

## वृद्ध महिलेकडून 30 लाख रुपये उकळून तिची फसवणूक करणाऱ्या बांधकाम व्यावसायिकावर गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

उलवे सेक्टर–१९ मध्ये उभारणाऱ्या एका बांधकाम व्यावसायिकाने सदर इमारतीतील फ्लॅट विकत देण्याचे आश्वासन देऊन एका वृद्ध महिलेकडून तब्बल ३० लाख रुपयांची रोख रक्कम घेऊन तिला गत पाच वर्षात फ्लॅट अथवा तिची रक्कम परत न करता तिची फसवणुक केल्याचे उघडकिस आले आहे. सुधीर देवीदास गव्हाळ असे या बांधकाम व्यावसायीकाचे नाव असून एपिएमसी पोलिसांनी त्याच्या विरोधात फसवणुकिसह अपहाराचा गुन्हा दाखल करुन या प्रकरणाच्या तपासाला सुरुवात केली आहे.

या प्रकरणात फसवणुक झालेल्या वृद्ध महिलेचे नाव निता सावल (७८) असे असून त्या उलवे सेक्टर–२१ मध्ये भाडय़ाच्या खोलीत कुटुंबासह रहाण्यास आहेत. निता सावल यांना उलवे भागात स्वत:चे घर विकत घ्यायचे असल्याने २०१७ मध्ये त्यांनी फ्लॅटची शोधा–शोध सुरु केली होती. त्यावेळी निता सावल यांचा जावई किरण चिटणीस याने त्याच्या ओळखीतील इंडिया लँड इफ्राचे मालक सुधीर गव्हाळ याच्या कंपनीकडून उलवे भागात नवीन इमारतीचे बांधकाम सुरु होणार असल्याचे तसेच त्याची रेरामध्ये नोंदणी झाली असल्याची माहिती दिली होती. त्यावेळी निता सावल व चिटणीस यांनी सुधीर गव्हाळ याच्या तुर्भे सेक्टर–२४ येथील कार्यालयात जाऊन त्याच्या उलवे सेक्टर–१९ मधील बांधकाम सुरु होणाऱ्या इमारतीतील १०४ क्रमांकाचा फ्लॅट ३० लाख रुपयांमध्ये विकत घेण्याचे निश्चित केले होते. त्यानंतर निता सावल यांनी मिरारोड येथील आपले घर विकून आलेल्या रक्कमेतील ३० लाख रुपये चेकद्वारे सुधीर गव्हाळ याला दिले होते. त्यावेळी गव्हाळ याने पनवेल येथील दुय्यम निबंधक कार्यालयात रजिस्ट्रेशन करुन देतानाच दोन वर्षात इमारतीचे बांधकाम पुर्ण करुन फ्लॅटचा ताबा देण्याचे आश्वासन निता सावल यांना दिले होते.

मात्र, दोन वर्षे उलटून गेल्यानंतर देखील गव्हाळ याने सदर जागेवर बांधकाम सुरु केले नाही. त्यामुळे निता सावल यांनी गव्हाळ याच्याकडे जाऊन त्यांना लवकर फ्लॅट देण्याची मागणी केली होती. त्यामुळे गव्हाळ याने इमारतीचे बांधकाम पुर्ण होईपर्यंत त्यांना दर महिन्याला ९ हजार रुपये इतके घरभाडे देण्याचे कबुल केले होते. त्यानुसार सुरुवातीचे २ महिने त्याने निता सावल यांना घरभाडे दिले, मात्र त्यानंतर त्याने भाडे देणे बंद केले. त्यानंतर त्याने टाळाटाळ करण्यास सुरुवात केली. त्यामुळे निता सावल यांनी गव्हाळ याच्याकडे आपले पैसे परत मागण्यास सुरुवात केल्याने गव्हाळ याने ३० लाख रुपयांचा चेक निता सावल यांना दिला होता. मात्र सदरचा चेक बाऊन्स झाला. तेव्हांपासून आजपर्यंत सुधीर गव्हाळ याने निता सावल यांना फ्लॅटही दिला नाही, तसेच त्यांची रक्कम सुद्धा त्यांना परत केली नाही. त्यामुळे आपले पैसे मागून थकलेल्या निता सावल यांनी अखेर एपीएमसी पोलीस ठाण्यात धाव घेऊन लेखी तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी बांधकाम व्यावायीक सुधीर गव्हाळ याच्या विरोधात फसवणुकिसह अपहाराचा गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा तपास सुरु असून अद्याप या प्रकरणात कुणालाही अटक करण्यात आली नसल्याची माहिती पोलिसांनी दिली.

# बोर्लीपंचतन सरपंचपदी ज्योती परकर

**दै.रायगड नगरी । दिघी**



श्रीवर्धन तालुक्यातील राजकीय दृष्टीने प्रतिष्ठित अशा बोर्लीपंचतन ग्रामपंचायतच्या सरपंचपदी ज्योती परकर या विराजमान झाल्या. यावेळी तब्बल बारा वर्षानंतर सरपंचपद राष्ट्रवादीकडे आले असून बोर्लीपंचतन ग्रामपंचायत वर महाविकास आघाडीची सत्ता आहे.

काल सोमवार दिनांक २९ रोजी बोर्लीपंचतन ग्रामपंचायतच्या सरपंचपदासाठी निवडणूक घेण्यात आली. मागील सरपंच नम्रता निवास गाणेकर यांचा अडीच वर्षाचा कालावधी संपल्यानंतर त्यांनी आपल्या पद–ाचा राजीनामा दिला. त्यांनतर या रिक्त सरपंच पदासाठी सोमवारी ग्रामपंचायत सदस्यांमधून निवडणूक घेण्यात आली. यामध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या ज्योती परकर यांची पुढील एक वर्षासाठी निवड करण्यात आली. श्रीवर्धनच्या बोर्लीपंचतन ग्रुपग्रामपंचायत मध्ये महाविकास आघाडीची सत्ता असून तालुक्यातील महत्वाची ग्रामपंचायत मानली जाते. यामध्ये शिवसेना ६, राष्ट्रवादी कॉंग्रेस ८ व कॉंग्रेस आय १ असे पक्षीय बलाबल असून २०१९ मध्ये झालेल्या ग्रामपंचायत निवडणुकीमध्ये खुल्या प्रवर्ग महिला उमेदवारासाठी असलेले सरपंच पद जनतेतून निवडून देण्यात आले होते. यामध्ये महाविकास आघाडीतील शिवसेना पक्षाच्या उमेदवार नम्रता निवास गाणेकर निवडून आल्या होत्या. महाविकास आघाडीच्या अंतर्गत समझोत्यानुसार सरपंच पद प्रथम अडीच वर्षे शिवसेना व व पुढील उर्वरित अडीच वर्षे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाकडे देण्यात आले होते त्यामुळे सरपंच असलेल्या नम्रता गाणेकर यांचा अडीच वर्षाचा कालावधी संपल्याने त्यांनी आपल्या सरपंच पदाचा राजीनामा दिला आहे.

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या वतीने श्रीवर्धन राष्ट्रवादी कॉंग्रेस महिला अध्यक्ष व सद्य स्थितीमध्ये ग्रामपंचायत सदस्य असलेल्या ज्योती परकर व सदस्या स्वाती चंद्रकांत तोडणकर यांच्यात लढत होणार होती. मात्र, यावर खासदार तटकरे यांच्या सूचनेनुसार पहिल्या वर्षासाठी ज्योती दिपक परकर व पुढील दीड वर्षासाठी समिधा तोडणकर सरपंच पद देण्याचे ठरले आहे. त्यावेळी निर्धारित वेळेत निवडणूक पीठासीन अधिकारी सुनील मोरे यांच्याकडे ज्योती परकर यांचा सरपंच पदासाठी एकमेव अर्ज आला. त्यामुळे पीठासीन अधिका–यांनी बोर्लीपंचतन ग्रामपंचायतच्या सरपंच पदी ज्योती परकर यांची बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर केले.

## बिगारी काम करणारा कामगार जखमी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

बिगारी काम करणाऱ्या कामगाराला एका दुचाकीची धडक बसल्याने तो जखमी झाल्याची घटना कळंबोली सर्कल परिसरात घडली आहे.

मुंब्रा–पनवेल रोडवरील कळंबोली सर्कल वरील सर्कलवर उभ्या असलेल्या दुचाकीला मागून आलेल्या बल्कर गाडीने धडक दिल्याने दुचाकीवरील बिगारी काम करणारा कामगार बबन जाधव हा जखमी झाला आहे. त्याला तातडीने नजिकच्या रुग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आले असून या अपघाताची नोंद कळंबोली पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## खेळामध्ये प्रामाणिकपणे कष्ट घेतल्यास यश नक्की मिळते : प्रांताधिकारी ललिता बाबर


**दै.रायगड नगरी । पनवेल**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, रायगड यांच्या वतीने जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेचे आयोजन कर्नाळा स्पोर्ट्स अकॅडमी, पनवेल येथे करण्यात आले.



या स्पर्धेमध्ये रायगड जिल्ह्यातील १८ वर्षाखालील मुलांच्या एकूण १६ संघांनी सहभाग घेतला. स्पर्धेचे उद्घाटन आंतरराष्ट्रीय धावपटू तथा प्रांताधिकारी उरण ललिता बाबर यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आले. यावेळी ललिता बाबर यांनी उपस्थित खेळाडूंना मार्गदर्शन करताना खेळाडूंनी आपल्या खेळांमध्ये प्रामाणिक कष्ट घ्यावे तसेच खेळांमधील जय–पराजय हे खिलाडू वृत्तीने स्वीकारावेत. पराजित झालेल्या खेळाडूंनी निराश न होता पुन्हा नव्या जोमाने पुढील स्पर्धेची तरी करून अधिकाधिक यश संपादन करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावेत, त्यांनी उपस्थित खेळाडूंना सांगितले.

यावेळी जिल्हा क्रीडा अधिकारी रविंद्र नाईक, शिवछत्रपती पुरस्कार विजेते तसेच या निवड समिती सदस्य सूर्यकांत ठाकूर, संजय कडू, कर्नाळा स्पोर्टस कॅडमीचे अध्यक्ष मुकुंद म्हात्रे, रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनचे जनार्दन पाटील, प्रो–कबड्डी स्पर्धेचे पंच सुहास पाटील, कबड्डी असोसिएशनचे पंच, तांत्रिक अधिकारी, क्रीडा शिक्षक इत्यादी मान्यवर उपस्थित होते. या स्पर्धेसाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व कर्नाळा स्पोर्ट्स अकॅडमी येथील अधिकारी कर्मचारी तसेच रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनचे पंच व इतर पदाधिकारी परिश्रम घेत आहेत.



## खारघरमध्ये लवकरच आगरी कोळी भवन

### शिवसेनेच्या प्रयत्नांना यश : नगरविकासमंत्र्याकडून हिरवा कंदील

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल परिसरात नवी मुंबईच्या धर्तीवर आगारी कोळी कराडी भवन उभारण्याच्या मागणीला नगरविकास मंत्री यांनी हिरवा कंदील दिला असून, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांच्या मागणीला यश आले. मंत्री एकनाथ शिंदे यांनी संबंधित प्रस्ताव तयार करण्याच्या सूचना सिडकोच्या व्यवस्थापकीय संचालकांना केल्या आहेत.

सेनेचे जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांनी यासंदर्भात १३ ऑक्टोबर रोजी नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांना निवेदन सादर करीत आगारी कोळी संस्कृतीचे प्रतीक असलेले आगारी कोळी कराडी भवन पनवेल महानगरपालिका क्षेत्र खारघर मध्ये उभारण्याची मागणी केली होती. नवी मुंबई ही आगारी कोळी कराडी स्थानिक प्रकल्पग्रास्तांच्या त्यागातून उभी राहिली आहे. हजारो हेक्टर जागा सिडकोने संपादित करून या ठिकाणी मोठमोठे प्रकल्प उभारले आहेत. त्यामुळे स्थानिक आगारी कोळी कराडी संस्कृतीचे भव्य–दिव्य असे भवन उभारणे गरजेचे आहे. अशी जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांची भावना आहे. यासंदर्भात खारघर शहरात अश्याप्रकारे भवन उभारले जाणार असल्याचे शिरीष घरत यांनी संगितले. सिडकोमार्फत खारघर शहरात हे भवन उभारले जाणार असे घरत यांनी संगितले.